जावक क्र. ५१०३/२०१९
भारती विद्यापीठ पो स्टे पुणे
दि. १० /०६/२०१९

प्रति,

मा.जनसंपर्क अधिकारी सो,
पोलीस आयुक्तालय पुणे शहर.
यांना सविनय सादर,

प्रतिवेदक :- विद्या राऊत, पोलीस उप-निरीक्षक भारती विद्यापीठ पो.स्टे.पुणे
यांजकडुन विनंती पुर्वक की,

विषय : अज्ञात आरोपीचा तपास होणेकामी सर्व वर्तमान पत्रात माहिती प्रसिध्दी होणेबाबत.

---

महोदय

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, भारती विद्यापीठ पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ४०७/२०१९, भा. दं. वि कलम ३१५, ३१७ अन्वये दि. ०४/०६/२०१९ रोजी दाखल असून दाखल गुन्ह्यामध्ये पंढरपूर अर्बन बँकेच्या लगत असलेल्या लेनमध्ये, दळवीनगर, आंबेगाव बुा, पुणे येथे कोणीतरी अज्ञात आरोपी इसमाने अगर महिलेने स्त्री अपत्य जन्माची लपवणूक करण्यासाठी व जन्मानंतर स्त्री अर्भकाचा मृत्यू घडावा या उद्देशाने कॅरिबॅगमध्ये घालून मरणासाठी उघड्यावर टाकून अर्भकाचा परित्याग केला म्हणून अज्ञात महिला/इसमांविरुध्द वरीलप्रमाणे गुन्हा दाखल आहे.

तरी दाखल गुन्हातील अज्ञात आरोपीचा शोध होणेकरीता पुणे शहर, पुणे ग्रामिण व आजूबाजूच्या हॉस्पिटलमध्ये दि. ०४/०६/२०१९ रोजी प्रसूत झालेल्या महिलांची माहिती मिळणेकरिता, तसेच दि. ०४/०६/२०१९ रोजी आपले कोणत्या हॉस्पिटलमध्ये महिला प्रसूत होवून लगेच हॉस्पिटल सोडून गेली असल्यास सदर महिलेची संपूर्ण माहिती ,एखादी महिला हॉस्पिटलमध्ये प्रसूत न होता प्रसूत झाल्यानंतर उपचाराकरिता हॉस्पिटलमध्ये आली व तिच्याकडे तिचे नवजात अर्भक नसेल तर अशा महिलेची माहिती हॉस्पिटलकडून मिळणेकरिता सर्व वर्तमान पत्रांत वरील माहिती प्रसिध्द होणेस विनंती आहे.

अज्ञात आरोपीचा तपास लागल्यास संपर्क साधणेचे ठिकाण
भारती विद्यापीठ पो.स्टे.पुणे ०२०-२४३६५१००

मार्फतीने
मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक सो
भारती विद्यापीठ पो.स्टे पुणे शहर

पोलीस निरीक्षक (गुन्हे)
भारती विद्यापीठ पो. ठाणे, पुणे.

मा.सादर व्हावे,

Raut V.B

पोलीस उप-निरीक्षक,
भारती विद्या.पो ठा.पुणे